**मोटार अपघात न्यायाधीकरण, केळापूर, जिल्हा यवतमाळ यांचे न्यायालयात**

(सदस्य, न्यायाधीकरण, प्र. बा. नाईकवाड यांचे समक्ष)

**मोटार अपघात दावा क्र. ७७/२०१६**

CNR No. MHYA 080005932016

श्रीमती माधवी चिंटू क्रिष्णपल्ली + ४

– **विरुध्द** –

रोहीत रमेश तुंगावार + ३

**निशाणी २५ चे अर्जाखालील आदेश**

(पारीत दिनांक २९/०९/२०२२)

१. अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज, अर्जदार क्र. २ चे नाव जस्टीन (Justin) ऐवजी जास्टीन (Jastin) व अर्जदार क्र. ३ चे नाव जोयेका (Joyeka) ऐवजी जोएन्ना (Joanna) अशी मुळ दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी मिळणेबाबत दाखल केलेला आहे. अर्जदाराचे विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की, दावा दाखल करतेवेळी नजरचुकीने सदरची चुक झालेली आहे. त्यामुळे मुळ दाव्यात सदरची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. करीता, सदरची परवानगी देण्यात यावी. सदरचे दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. करीता अर्ज मंजूर करण्यात यावा.

२. अर्जदार क्र. ३ चे विद्वान वकीलांनी सदरचे अर्जास विरोध केला. त्यांनी युक्तीवाद केला की, अर्जदाराने केलेला अर्ज संयुक्तीक व कायदेसंगत नाही. करीता, तो फेटाळण्यात यावा.

३. मी दोनही विद्वान वकीलांचा युक्तीवाद लक्षात घेतला असता तसेच दाव्याचे स्वरुप विचारात घेतले असता माझे निदर्शनास येते की, अनावधानाने नावामध्ये बदल झालेला आहे. त्यामुळे दाखल दस्त लक्षात घेता निश्चीतच

अर्जदारांनी केलेली मागणी योग्य असल्याचे दिसून येते. मोटार अपघात वाहन कायदयाखालील सदरची प्रकरणे ही सोशल लेजीसलेशन असल्यामुळे नामदार सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निवाडयांनुसार सुध्दा अर्जदार हे प्रस्तुतची दुरुस्ती करण्यास परवानगी मिळविण्यास हक्कदार ठरतात.

४. त्यामुळे सदरचे न्यायतत्व व दाव्यातील परिस्थिती लक्षात घेता न्यायाच्या दृष्टीने सदरचा अर्ज मंजुर करणे न्यायसंगतच ठरते व त्यामुळे गैरअर्जदारांना कोणतेही नुकसान होणारे नाही व दाव्याचे स्वरुप सुध्दा बदलणार नाही. करीता, न्यायाचे दृष्टीने सरतेशेवटी मी खालील आदेश पारीत करतो.

## <u>आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदारांनी प्रस्तावित दुरुस्ती ०७ दिवसांचे आत करावी व दुरुस्त दावा प्रत दाखल करावी.

३. अर्जदारांनी केलेल्या सदरचे दुरुस्तीच्या अनुषंगाने, गैरअर्जदार हे सुध्दा त्यांचे लेखी कथनात व जवाबात दुरुस्ती करण्यास हक्कदार आहेत.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
PRADEEP
BAPURAO
NAIKWAD
Date: 2022.09.30
11:14:49 +0530

दिनांक – २९/०९/२०२२ (प्र. बा. नाईकवाड)

सदस्य,

मोटार अपघात न्यायाधीकरण, केळापूर.